21 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यशास्त्र अधिविभागातर्फे विद्यापीठात आजपासून चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभाग आणि श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे आज, मंगळवारी आणि उद्या, बुधवारी राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. 'भारतीय लोकशाहीचे बदलते प्रवाह व महिला सक्षमीकरण'असा या चर्चासत्राचा विषय आहे.

विद्यापीठामधील मानव्यशास्त्र सभागृहात मंगळवारी सकाळी साडेदहा वाजता चर्चासत्राचे उद्घाटन 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर त्यांचे 'निवडणुका व लोकशाही' या विषयावर बीजभाषण होईल. उद्घाटनानंतरच्या सत्रात प्रा. आनंद पाटील, रवींद्र भणगे, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, ज्येष्ठ पत्रकार सुशील कुलकर्णी, प्रा. नितीन परिमल, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील, शिरीष पवार, पी. एस. कांबळे हे विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. चर्चासत्रात भारतीय समाजातील विज्ञानाची प्रगती व विकास, भारतीय राजकारणातील 'सांस्कृतिक राजकारण', नेहरु युगातील लोकशाही व निवडणुकांचे राजकारण, गांधी युगातील लोकशाही चर्चाविश्वे, महिलांचा राजकारणातील सहभाग व अहिंसक राजकीय क्रांती, शहरी व ग्रामीण स्थानिक शासन संस्थांचे राजकारण : बदलते प्रवाह, आदी विषयांवर मार्गदर्शन, चर्चा होणार आहे, अशी माहिती श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. वासंती रासम यांनी दिली. (प्रतिनिधी)

21 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स

जनसपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाची परीक्षेची घाई



शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षांना २४ मार्चपासून सुरुवात होणार आहे. बी. ए., बी. कॉम, बी, एसस्सी या परीक्षाबरोबर पदव्युत्तर विभागांच्या अशा ६१४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. मे २०१७ अखेर सुरू राहणाऱ्या परीक्षांसाठी सुमारे दोन लाख ५० हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. पदवी अभ्यासक्रमासाठी त्या-त्या कॉलेजवर परीक्षा केंद्रांचे नियोजन केले असून त्यासाठी प्रश्नपत्रिका पाठवण्याचे नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे.



| शाखा विद्यार्थी | |
|---|---|
| बी. ए. | : भाग एक - २५,०२४ |
| बी. ए. | : भाग दोन - १७,४०५ |
| बी. कॉम | : भाग एक - १८,७८७ |
| बी. कॉम | : भाग दोन - १३,२१६ |
| बी. एसस्सी | : भाग एक - १९,४०३ |
| बी. एसस्सी | : भाग दोन - १२,२४३ |
| एम. कॉम. | : भाग एक - २,५१२ |
| एम. कॉम. | : भाग दोन - १,७९७ |
| बी. बी. ए. | : भाग एक - १,०८० |
| बी. बी. ए. | : भाग दोन - ९०० |

**एम. ए. (इंग्लिश)**
एम. ए. : भाग एक - १,६७०
एम. ए. : भाग दोन - १४१०

**एम. ए.: हिंदी**
एम. ए. : भाग एक - ५७३
एम. ए. : भाग दोन - ५१७

**एम. ए.: (मराठी)**
एम. ए. : भाग एक - ७७४
एम. ए. : भाग दोन - ७६८

**एम. ए. (भुगोल)**
एम. ए. : भाग एक - १०४
एम. ए. : भाग दोन - १११

**एम. ए. (इतिहास)**
एम. ए. : भाग एक - ९०७
एम. ए. : भाग दोन - ८०८

**एम. ए. (राज्यशास्त्र)**
एम. ए. : भाग एक - ६०६
एम. ए. : भाग दोन - ५२९

**एम. ए. (समाजशास्त्र)**
एम. ए. : भाग एक - ५५८
एम. ए. : भाग दोन - ५५५

**बी. ई. (सिव्हिल)**
बी. ई. : भाग एक - १२६७
बी. ई. : भाग दोन - २८९०
बी. ई. : भाग तीन - १५९०

**बी. ई. (इलेक्ट्रिकल)**
बी.ई. : भाग एक - ३८३
बी. ई. : भाग दोन - १३०७
बी. ई. : भाग तीन - ७४१

**कम्प्युटर सायन्स अँड इंजिनीअरिंग**
बी. ई. : भाग एक - १०४०
बी. ई. : भाग दोन - १३६६
बी. ई. : भाग तीन - ११३५

**बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स)**
बी. ई. : भाग एक - २२०
बी. ई : भाग दोन - ५२३
बी. ई. : भाग तीन - ३५३



**बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन)**
बी. ई.: भाग एक - ४२६
बी. ई.: भाग दोन - १६२३
बी. ई. :भाग तीन - ७४१

**बी. ई. (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी)**
बी. ई.: भाग एक - १४२
बी. ई.: भाग दोन - २०६
बी. ई. :भाग तीन - २४१

**बी. ई. (मेकॅनिकल)**
बी. ई.: भाग एक - १६६६
बी. ई.: भाग दोन - ४९६१
बी. ई.: भाग तीन - २६९६

**बी. फार्मसी : भाग एक - ११७५**
**बी. फार्मसी : भाग दोन - १२३६**
**बी. एस्सी : भाग एक - १०१०**
**बी. एस्सी : भाग दोन - ७५८**

2 1 MAR 2017 कुमार क्रांती

जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि दक्षिण कोरियातील म्याँगजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. शैक्षणिक तसेच संशोधन क्षेत्रातील संबंध अधिक बळकट करण्यासाठी तसेच दोन्ही विद्यापीठांनी परस्पर सहकार्य वाढविण्याबाबत हा करार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि म्याँगजी विद्यापीठाच्या वतीने प्रा. डॉ. जिआँग गिल सिओ यांनी स्वाक्षरी केल्या.

शिवाजी विद्यापीठाच्या नॅनो-सायन्स आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात झालेल्या या समारंभास नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान अधिविभाग समन्वयक प्रा. डॉ. पी. एस पाटील, संख्याशास्त्र अधिविभागाचे ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. डी.टी. शिर्के, आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. ए. व्ही. घुले उपस्थित होते.

या सामंजस्य करारात विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आदानप्रदान, संशोधन क्षेत्रात सहकार्य तसेच वित्तीय सहाय्य या बाबींचा समावेश आहे. याप्रसंगी डॉ. पी. एस पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाबद्दल तसेच विद्यापीठाचा शैक्षणिक संस्थामधील देशाअंतर्गत अग्रक्रम, मटेरिअल सायन्समधील असाधारण झेप आणि यापूर्वी विविध राष्ट्रांबरोबर झालेल्या सामंजस्य करारांबाबतची माहिती त्यांनी दिली. शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा दक्षिण कोरिया मधील विविध शिक्षण संस्थांमधला सहभाग लक्षात घेता, येथे 'कोरियन भाषा केंद्र' तसेच म्याँगजी तसेच इतर कोरियन विद्यापीठांत 'हिंदी भाषा केंद्र' स्थापन करण्याची आवश्यकता डॉ. पाटील यांनी व्यक्त केली. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी डॉ. पाटील यांच्या प्रस्तावाचे स्वागत केले, तसेच, या सामंजस्य करारामुळे दक्षिण कोरिया आणि शिवाजी विद्यापीठाचे संबंध आणखी दृढ होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.